यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी जि. वर्धा

# सांस्कृतिक समिती अहवाल

## सत्र . 2019 ते 2014

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय, देवळी,जि. वर्धा

## सांस्कृतिक समिती अहवाल

## 2018-19

- **26 जुलै 2018 -**

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा संचालित संस्थापक अध्यक्ष स्व. दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी श्री. बाळकृष्णजी हांडे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य प्रसारक, वर्धा यांच्या उपस्थितीत सकाळी 7.00 वाजता सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. 26 जुलै हा दिवस **“कारगील दिन”** म्हणून शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. सौ. शोभाताई तडस व शहिद पत्नी जनाबाई गेडाम या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. देवळीचे ठाणेदार श्रीमान ठाकूर साहेब उपस्थित होते.



श्री. बाळकृष्णजी हांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. उपाध्याय सर यांनी स्व. दाआजी यांच्या जिवनाविषयी माहिती दिली. “मरावे परी किर्ती रुपे उरावे” असे दाआजींचे जीवन व कार्य होते असे सांगीतले. शहिद पत्नी जनाबाई गेडाम यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन सर्व



पाहुण्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते. तसेच विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. यावले यांनी केले तर सर्वांचे आभार प्रा. गुजरकर  यांनी मानले.

- ## 15 ऑगस्ट 2018 -

सांस्कृतिक समितीच्या वतीने महाविद्यालयात 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी झेंडा वंदनाचा कार्यक्रम आयोजित केला. झेंडावंदनानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. देशाचे भविष्य आजच्या युवा वर्गावर आहे. त्यांनी स्वातंत्र्याचा इतिहास अभ्यासला पाहिजे व देशाचे स्वातंत्र्य कसे टिकून राहील यासाठी काय प्रयत्न करावे लागतील या संदर्भात माहिती दिली. या कार्यक्रमाला विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होत तसेच महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

- ## 5 सप्टेंबर 2018 -

शिक्षक दिनाचे औचित्य साधून 5 सप्टेंबर 2019 ला बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व शाखानिहाय प्रथम व व्दितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी डॉ. अहेर सर, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय व प्रमुख वक्ते प्रा. मोहन गुजरकर उपस्थित होते.




**शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी भाषण करतांना**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या फोटोचे पूजन सर्व मान्यवरांनी केले. स्वागतानंतर प्रमुख वक्ते प्रा. गुजरकर यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विषद केले. प्रमुख अतिथी यांनी आजचा शिक्षक व आजचा विद्यार्थी कसा असावा या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणानंतर कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या व प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने करण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा.राठी सर तर सर्वांचे आभार प्रा. यावले सर यांनी मानले. विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग उपस्थित राहिले.

- 2 ऑक्टोबर 2018 -

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक विभागाने महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियान या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुरेश उपाध्याय तर प्रमुख अतिथी डॉ. युवराज खोटेले उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वच्छता काळाची गरज या विषयावर भाषणे दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. उपाध्याय सर यांनी स्वच्छतेचे महत्व



विद्यार्थ्यांना पटवून दिले. या कार्यक्रमाला विद्याथी वर्ग उपस्थित होता. स्वच्छता अभियानात महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला कार्यक्रमाचे संचालन प्रा. चिनेवार यांनी केले तर सर्वांचे आभार प्रा. ढाले यांनी मानले.

## ▪ 15 ऑक्टोबर 2018 -

डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक विभागाने **"वाचन प्रेरणा दिवस"** या कार्यक्रमाचे आयोजन केले. सकाळी वाचन प्रेरणा दिना निमित्त "प्रभात फेरी" काढण्यात आली. "वाचाल तर वाचाल" असे नारे दिले. फेरीची सांगता करण्यात आली व लगेचच महाविद्यालयाचा सांस्कृतिक सभागृहात कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय यांनी प्रतिमेचे पूजन केले. या दरम्यान विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे वाचन केले. अध्यक्षीय भाषणा त डॉ. उपाध्याय सर म्हणाले **"ग्रंथ हेच गुरु"** आहे. ग्रंथ वाचनाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. विद्यार्थ्यांनी वाचनाला महत्व दिले पाहिजे. वाचनाने व्यक्तिमत्वाचा विकास होतो असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. यावले यांनी केले तर सर्वांचे आभार प्रा. मोहदुरे यांनी मानले.




## ▪ 6 डिसेंबर 2018 -




सांस्कृतिक समितीने 6 डिसेंबर 18 ला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम आयोजित केला.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते कुंभलकर सोशल वर्क कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख डॉ. पुनम येसंबरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. सुरेश उपाध्याय यांनी भूषविले सर्व पाहुण्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक समिती सचिव डॉ. प्रभाकर ढाले यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ. पुनम येसंबरे आपल्या भाषणात म्हणाले. डॉ. बाबासाहेब यांची उंची कोणीही गाठू शकणार नाही. त्यांनी आंबेडकरांच्या अष्टपैलू व बहुआयामी व्यक्तिमत्वाची ओळख त्यांनी करुन दिली. शेती, अर्थ, समाज व राजकारण, शिक्षण व आरोग्य या विषयावर चिकित्सकपणे उकल केली.

अध्यक्षीय भाषणातून डॉ.उपाध्याय म्हणाले डॉ. बाबासाहेबाचे विचार, उच्च कोटीचे होते. त्यांनी विचारातूनच क्रांती घडवून आणली. ग्रंथावर त्यांचे प्रेम होते. वाचन त्यांना प्रिय होते. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेबांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपला व्यक्तिमत्व विकास  घडविला पाहिजे असे ते म्हणाले .

- 5 जानेवारी 2019 -

शिक्षणाधिकारी कार्यालय व एस.एस.एन.जे. महाविद्यालय सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना **“आम्ही चमकते तारे”** हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटात शिक्षणासाठी धडपडणाऱ्या बालकाची आणि त्याला मदत करणाऱ्या शिक्षकाची कथा सांगण्यात आली. असाध्य अशा रोगाने (एडस्) ग्रस्त असणाऱ्या बालकाला कशी वागणूक मिळते.  पुढे ती शाळा त्या विद्यार्थ्यांला शाळेतून काढून टाकते. पुढे तो संघर्ष करुन जीवनात कसा यशस्वी होतो अशी जिद्दमय कथा या चित्रपटातून उलगडत जाते व तो यशस्वी होतो.



- 16 व 17 जानेवारी 2019 -

भारत सरकार प्रसारण मंत्रालय व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात **“निबंध स्पर्धा व**

**रांगोळी"** स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले होते.  व तसेच या वेळी महाविद्यालयात लगतच्या पांच गांव या गावी जन जागरण रॅली काढण्यात आली शासनाच्या विविध योजनाची माहिती ग्रामस्थांना व्हावी हा हेतु डौळयासमोर ठेऊन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी हिरवी झंडी दाखविली  या कार्यक्रमात 50 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. निबंध स्पर्धेकरीता **"जनधन योजना"  बेटी बचाव बेटी पढाव** व **स्वच्छता व आरोग्य** हे विषय ठेवण्यात आले. रांगोळी स्पर्धेकरीता पर्यावरण व बेटी बचाव बेटी पढाव या विषयाचे आयोजन केले.

या स्पर्धेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी प्रथम व व्दितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण  कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय प्रमुख मार्गदर्शक, जनसंपर्क अधिकारी श्री.बी.एस. मिरगे व शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या विविध योजनाचे कार्यक्रम प्रमुख श्री. रामटेके उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रभाकर ढाले यांनी केले व प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे व प्रा. सुनिल राठी यांचे वरील विषयावर मार्गदर्शन झाले.



अध्यक्षीय भाषणानंतर या स्पर्धेत सहभागी झालेल्या व विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. चिनेवार सर यांनी तर सर्वांचे आभार प्रा. यावले यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद उपस्थित राहिले.

- ## 23 व 24 जानेवारी 2019 -

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने दिनांक 23 व 24 जानेवारी 2019 ला सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अंतर्गत विविध स्पर्धा आयोजित केल्या. यात रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, गीतगुंजन, एक मिनिट शो, वेशभूषा, व नृत्य इत्यादी





स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या 100 विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## ▪ 25 जानेवारी 2019 –



तहसिल कार्यालय, देवळी व सांस्कृतिक विभाग एस.एस.एन.जे. महाविद्यालय, देवळी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 25 जानेवारी 2019 ला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात "राष्ट्रीय मतदार दिवस" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी 8.00 वाजता सर्व विद्यार्थी व शिक्षकांच्या उपस्थितीत महाविद्यालय ते देवळी गावात राष्ट्रीय मतदार दिनाची फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी मतदारांना नारे देऊन मतदानासाठी जागृत केले. फेरीची सांगता महाविद्यालयात करण्यात आली.

सांस्कृतिक सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धा, वादविवाद या स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेत 30 विद्यार्थी सहभागी झाले. स्पर्धेत प्रथम, व्दितीय व तृतिय येणाऱ्या विद्यार्थ्यांना देवळी तहसिल कार्यालयामार्फत प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. जीवन कांबळे, कु.गायत्री पिंपळकर, कोमल गोमासे, स्वाती परतपुरे प्रियंका करलुके व स्नेहल गाठे या विद्यार्थीनींचा समावेश होता.

## ▪ 26 जानेवारी 2019 -



प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दिनांक 26 जानेवारी 2019 ला बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला. सकाळी 8.00 वाजता झेंडावंदन या कार्यक्रमानंतर

लगेचच बक्षीसे देण्यात आली. या सोहळयाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय प्रमुख अतिथी श्री. लक्ष्मीनारायण पांडे महाराष्ट्र बँक निवृत्त अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक सचिव प्रा.डॉ. प्रभाकर ढाले यांनी केले. प्रमुख अतिथी भाषणात म्हणाले. शालेय शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगी अनेक सुप्तगुण असतात. त्यागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागामार्फत विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यात प्रत्येकांनी सहभाग नोंदविला पाहिजे. अध्यक्षीय भाषणानंतर लगेचच बक्षीस वितरण करण्यात आले या कार्यक्रमात क्रिडा विभागाद्वारे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे संचालन प्रा.राठी तर सर्वांचे आभार प्रा. जगदीश यावले यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

- ## 26 जानेवारी ते 31 जानेवारी 2019 -




तहसिल कार्यालय, देवळी व एस.एस. एन.जे. महाविद्यालय, देवळी यांच्या संयुक्त विद्यमाने



मतदार जागृत मोहिमे अंतर्गत 'पंधरवाडा' या कार्यक्रमाचे आयोजन केले. **"मतदार जागा हो"** असे नारे देत फेरी काढण्यात आली व दोन दिवस

विविध कार्यक्रम घेण्यात आले. वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेण्यात आले. वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या 45 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना देवळी तहसिल कार्यालयामार्फत गौरविण्यात आले. स्पर्धेत प्रथम, व्दितीय व तृतिय आलेल्या विद्यार्थ्याना प्रमाणपत्र देण्यात आली.

- 1 फेब्रुवारी 2019 -

'ओम साई काशी तृष्णा विकास संस्था' द्वारा संचालीत दिनांक 1 फेब्रुवारी 2019 ला



सकाळी 7.00 वा. महाविद्यालयाच्या प्रांगणात **"योगा व डान्स"** चे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय व प्रमुख अतिथी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था जनरल सेक्रेटरी श्री. प्रकाशरावजी ढांगे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक समिती सचिव डॉ. प्रभाकर ढाले यांनी केले.



योगा मास्टर व योगा डान्स शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात योगाचे महत्व काय? यावर प्रथम मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी मा. प्रकाशरावजी ढांगे यांनी योगा या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. सकाळी 7. 00 ते 9.00 पर्यंत योगा संबंधीचे धडे देण्यात आले. प्रत्यक्ष कृतीतून हा कार्यक्रम साकारण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्वच विद्यार्थी सहभागी झाले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## ▪ 14 फेब्रुवारी 2019 -

महाराष्ट्र शासन आरोग्य शिक्षण कार्यक्रमातंर्गत व एस.एस.एन.जे. महाविद्यालय, देवळी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम जि. वर्धा यांनी "प्रश्न मंजुषा चे आयोजन केलेले होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील 70 विद्यार्थी सहभागी झाले. कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय उपस्थित होते. आरोग्य अधिकारी श्री. राजू शेलोटे, श्री. शरद मानकर, अमर सुहागपुरे व श्रीमती ताकसांडे मॅडम उपस्थित होत्या. श्री. राजु शेलोटे यांनी कुष्ठरोग का? व कसा होतो. त्यासंबंधी समाजात काय गैरसमज पसरलेले आहे. त्या रोगाची लागण कशी होते तो बरा होणारा रोग आहे. यावर प्रत्यक्ष चलचित्रफिती व्दारे योग्य मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले. यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्तरे दिली.




या प्रश्न मंजूषाच्या कार्यक्रमात प्रश्नांची उत्तरे दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाची बक्षीसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी जि. वर्धा

# सांस्कृतिक समिती अहवाल

## सत्र . 2017 ते 2018

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी,जि. वर्धा

## सांस्कृतिक समिती अहवाल

## 2017-18

- ## 26 जुलै 2017 -

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा संस्थापक अध्यक्ष स्व. दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. व तसेच कारगिल दिनानिमित्त् शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. सकाळी 7.00 वाजता सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. वर्धा येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य






प्रचारक व प्रसारक श्री. बाळकृष्णजी हांडे व त्यांचे सहकारी व्ही.एल. बुटे यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून बाळकृष्णजी हांडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांवर प्रकाश टाकला व सोबतच विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी स्व. दाआजी यांचा जीवनपट उलगडून दाखविला. **'मरावे परी किर्ती रुपे उरावे'** या उक्तीप्रमाणे त्यांचे जीवन होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या **'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे'** . या गीताने झाली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.

- ## 15 ऑगस्ट 2017 -

स्वांतत्र्य दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात 15 ऑगस्टला सकाळी झेंडा वंदनाचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाच्यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. महाविद्यालयातील NCC विभागातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ पथ संचालन केले. झेंडा वंदनानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मिळालेले स्वातंत्र्य आजच्या तरुणाने अबाधीत ठेवले पाहिजे असा मोलाचा संदेश त्यांनी आपल्या उपदेशपर भाषणातून दिला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते. विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.



- ## 19 ऑगस्ट 2017 -

सांस्कृतिक विभागाने दि.19 ऑगस्ट ला महाविद्यालयात चिनी वस्तुवर बहिष्कार व स्वदेशी वस्तुंचा वापर या विषयांवर व्याख्यानाचे आयोजन केले. राष्ट्रीय सुरक्षा अभियान, देवळी तालुका अध्यक्ष श्री. दिपक सेठीया या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रमुख अतिथी श्री. लाबंट सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सर्वांचे आभार प्रा. चिनेवार यांनी मानले.



- ## 5 सप्टेंबर 2017 -

5 सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षकदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील वर्ग 12 वा सर्व शाखा व तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतून प्रथम व व्दितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय सर उपस्थित होते. प्रमुख अतिथी श्री. सोनवणे साहेब माजी शिक्षणाधिकारी, वर्धा यांची उपस्थिती होती.




डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे सर्व पाहुण्यांनी पुजन केले. माल्यार्पणानंतर प्रास्ताविक पर भाषणात सांस्कृतिक समिती सचिव प्रा. ढाले यांनी आजच्या कार्यक्रमाची रुपरेषा कथन केली. प्रमुख पाहुणे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून आजचा विद्यार्थी कसा असावा या बद्दलचे मार्गदर्शन झाले. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.

- ## 2 ऑक्टोंबर 2017 -

राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या **"जयंती निमित्त"** सांस्कृतिक समितीने महाविद्यालय परिसर स्वच्छता या कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालय परिसर स्वच्छतेनंतर प्राचार्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन

केले. विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेत्तर वृंद सहभागी झाले.

- 15 ऑक्टोंबर 2017 -

15 ऑक्टोबर 2017 हा दिवस माजी राष्ट्रपती डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून महाविद्यालयात सांस्कृतिक समितीने आयोजित केला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय सर उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी मराठी विभाग प्रमुख डॉ. जी.जी. मालधुरे उपस्थित होते. या कार्यक्रमास सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी पुस्तकातील कविता, उतारे याचे वाचन केले. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय यांनी वाचाल तर वाचाल या विषयावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला शिक्षक , शिक्षिकेत्र व विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थितहोते.




- 6 डिसेंबर 2017 -

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक समिती सचिवांनी केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय उपस्थित होते. प्रमुख अतिथी सुवालाल पाटणी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. भूषण रामटेके उपस्थित होते.



डॉ. भूषण रामटेके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला ग्रंथवेडे बाबासाहेबांचा आदर्श आजच्या विद्यार्थ्यांनी ठेवला पाहिजे असा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून दिला. अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य व कर्तृत्वाची ओळख करुन दिली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. यावले यांनी केले तर सर्वांचे आभार प्रा. चिनेवार यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

- **23 व 24 जानेवारी 2018 -**



सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयात 23 व 24 जानेवारी 2018 ला विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सुप्त गुणांचा वाव मिळावा या हेतूने वाद-विवाद स्पर्धा, पाककला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, एक मिनिट शो, वेषभूषा स्पर्धा, नृत्य, गायन इत्यादी स्पर्धा आयोजित केल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे **उद्घाटन** महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उपाध्याय यांनी केले.



## ▪ 26 जानेवारी 2018 -

26 जानेवारीला प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सांस्कृतिक विभागामार्फत 23 व 24 जानेवारी 18 ला घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा, क्रिडा स्पर्धा या स्पर्धेत प्रथम व व्दितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी 8.00 वा. झेंडा वंदना नंतर बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला . या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे प्रा. हाशम शेख तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. उपाध्याय उपस्थित



होते. प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणानंतर स्पर्धेत प्रथम व व्दितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांनी बक्षीसे देण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता संत ज्ञानेश्वर यांच्या पसायदानाने करण्यात आली व शेवटी प्रा. अमित चिनेवार यांनी सर्वांचे आभार मानले.

ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी जि. वर्धा

# सांस्कृतिक समिती अहवाल

## सत्र . 2016 ते 2017

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी, जि. वर्धा.

## सांस्कृतिक समिती अहवाल

## 2016-17

- **26 जुलै 2016 :**

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था संस्थापक अध्यक्ष स्व. दाआजी उर्फ बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. सकाळी 8.00 वाजता दाआजी यांच्या पुतळयाला हारार्पण करण्यात आले नंतर सर्वधर्मिय प्रार्थना घेण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी श्री बाळकृष्णजी हांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुरेश उपाध्याय उपस्थित होते.



प्रमुख अतिथीने राष्ट्रसंताची भजने ऐकविले व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून स्व. दाआजी याचा सुरवातीपासून त्यांनी शिक्षणक्षेत्राला कसे वाहून घेतले. त्यांचे शिक्षण क्षेत्र नाही तर सहकारी क्षेत्राशी ते कसे जुळले होते यावर भाष्य केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रसंताच्या राष्ट्रगीताने करण्यात आली.

## ▪ 5 सप्टेंबर 2016 :

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा व्हावा या हेतूने सांस्कृतिक समितीने महाविद्यालयात 'शिक्षक दिन' या कार्यक्रमाचे आयोजन केले. या दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परिक्षेत प्राविण्य प्राप्त केले त्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी प्रा. प्रमोद बाविस्कर उपस्थित होते. अध्यक्षीय स्थान डॉ. सुरेश उपाध्याय यांनी भूषविले या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे 'आजचे शिक्षण' या विषयावर भाषणे झाली. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शना नंतर प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




## ▪ 2 ऑक्टोंबर 2016 :

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात सांस्कृतिक समितीने परिसर स्वच्छतेचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले. शिक्षक व शिक्षकेत्तर वृंदानी सहभाग नोंदवला. परिसर स्वच्छतेनंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी केले. स्वच्छता काळाची गरज आहे... या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



- **15 आक्टोबर 2016 :**

**दि. 15 ऑक्टोबर 2016 ला** सांस्कृतिक विभागाने डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतिनिमीत्त वाचन-प्रेरणा दिनाचा कार्यक्रम आयोजित केला. वाचन प्रेरणा दिना निमीत पाचगांव येथे फेरी काढण्यात आली फेरीतील विद्यार्थ्यांनी वाचाल तर वाचाल अशे नारे दिले त्यानंतर सांस्कृतिक सभागृहात वाचन दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुरेश उपाध्याय तर प्रमुख अतिथी डॉ. जी.जी. मालधुरे उपस्थित होते या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पुस्तकातील उतारे तसेच कविता चे वाचन केले या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुरेश उपाध्याय यांनी वाचनाचे महत्व विशद केले या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.




- **27 आक्टोबर 2016 :**

सांस्कृतिक समितीने महाविद्यालयात “पॉवरग्रीड ऑफ इंडिया लिमिटेड, देवळी” व सांस्कृतिक समिती यांच्या विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहात वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. **“एकात्मता आणि भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रोत्साहनामध्ये सार्वजनिक सहभाग”** या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत 7 विद्यार्थी सहभागी झाले. त्यांच्यावतीने प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय उपस्थित होते.



## ▪ 6 डिसेंबर 2016 :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयात सांस्कृतिक समितीने कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शिनी महिला कॉलेज येथील समाजशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख डॉ. धनंजय सोनटक्के तर अध्यक्षस्थानी




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय उपस्थित होते. डॉ. बाबासाहेबाचे सामाजिक विचार या विषयावर प्रमुख अतिथीने मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. उपाध्याय म्हणाले. बाबासाहेब हे नि:पक्षपाती विचारांचे होते. त्यांच्या विचारात समस्त मानवजात होती. त्यांनी केवळ एकाच जातीचा, समाजाचा विचार केलेला नव्हता. दलितांविषयी, दु:खितांविषयी त्यांचे प्रेम ओतप्रोत भरलेले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग, शिक्षक शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.

## ▪ 23 व 24 जानेवारी 2017 :

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने 23 व 24 जानेवारी 2017 ला विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले.



या महोत्सवात भावगीत, सिनेगीत, गीतगुंजन व तसेच बौध्दिक कार्यक्रमातंर्गत वाद-विवाद, वक्तृत्व, समयस्फूर्त भाषण स्पर्धा इत्यादीचे आयोजन केले. विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने पाककला, रांगोळी, मेहंदी स्पर्धेचे आयोजन केले. करमणूक म्हणून एक मिनिट, एकपात्रीप्रयोग, नृत्य , वेषभुषा इत्यादी कार्यक्रमाची आखणी केली. या कार्यक्रमात बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी केले. या कार्यक्रमाला स्पर्धकाचा व विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.



## ▪ 26 जानेवारी 2017 :

सांस्कृतिक समितीच्या वतीने महाविद्यालयात आयोजित केलेल्या विविध स्पर्धेत प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बक्षिस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रजासत्ताक दिनी झेंडावंदनाचा कार्यक्रम झाल्यानंतर लगेचच सांस्कृतिक सभागृहात पारितोषिकाचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र देवळी शाखेच्या दिदावत मॅडम तर कार्यक्रमाच अध्यक्ष महाविद्यालयाचे वाणीज्य विषय विभाग प्रमुख डॉ. दिलीप दबडे उपस्थित होते. प्रमुख अतिथीच्या मार्गदर्शनपर भाषणानंतर स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली.



ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी जि. वर्धा

# सांस्कृतिक समिती अहवाल

## सत्र . 2015 ते 2016

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी, जि. वर्धा.

## सांस्कृतिक समिती अहवाल

## 2015-16

- **26 जुलै 2015 :**

सांस्कृतिक समितीच्या वतीने यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था संस्थापक अध्यक्ष स्व. दाआजी उर्फ बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला दरवर्षी उपस्थित राहणारे श्री बाळकृष्णजी हांडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य प्रचारक, वर्धा श्री. बाळकृष्णजी हांडे उपस्थित राहिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली सर्वधर्मीय प्रार्थना घेण्यात आली. स्व. दाआजी अमर रहे असे नारे विद्यार्थ्यांनी दिले. सामुदायिक प्रार्थनेनंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शैक्षणिक विचार प्रमुख अतिथीनी विद्यार्थ्यांना सांगितले. स्व. दाआजी उर्फ बापूरावजी देशमुख यांच्या जीवनावर महत्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग, कर्मचारी वर्ग उपस्थित राहिला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रसंताच्या गीताने करण्यात आली.



## ▪ 15 ऑगस्ट 2015 :



15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात झेंडावंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सकाळी 8.00 वाजता झेंडावंदन करण्यात आले व नंतर सांस्कृतिक सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शाम देशपांडे उपस्थित होते. अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश उपाध्याय यांनी भूषविले. प्रमुख अतिथीने स्वातंत्रयदिनाचे महत्व विशद केले व त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. उपाध्याय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षीकेत्र व विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वाचे आभार प्रा. देशमुख सर यांनी मानले.

## ▪ 5 सप्टेंबर 2014 :

शिक्षक दिनाचे औचित्य साधून ़




डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती निमित्त रा.तु.म. नागपूर विद्यापीठ उन्हाळी परिक्षा 2015 या वर्षात प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बक्षीस वितरणाचा सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी डॉ. अन्वर सिद्दीकी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. सुरेश उपाध्याय यांनी भूषविले. “जीवन आणि शिक्षण” या विषयावर अनेक विद्यार्थ्यांनी भाषण दिले. प्रमुख अतिथीचे मार्गदर्शन लाभले. पुढे

स्पर्धात्मक युग आहे. आजचा विद्यार्थी स्पर्धेत कसा टिकेल यावर प्राचार्य डॉ. उपाध्याय सरांनी सखोल मार्गदर्शन केले. रा.तु.म. विद्यापीठ परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

- **2 आक्टों. 2015 :**



सांस्कृतिक समितीने महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात परिसर स्वच्छ करण्याचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थी सहभागी झाले. परिसर



स्वच्छतेनंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. “स्वच्छता परिसराची” या विषयावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

- **6 डिसेंबर 2015 :**

डॉ. बाबासाहेब महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयात सांस्कृतिक समितीने कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.दिलीप दबडे सर, उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून डॉ. सुरेश उपाध्याय यांनी उपस्थिती दर्शविली. जगातील किर्तीचे ज्ञानपिपासु डॉ. आंबेडकरांचे विचार आज जगात सर्वत्र पसरलेले आहे. असे विचार प्रमुख

अतिथीचे मांडले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. बाबासाहेबाचे जीवन व कार्य यावर प्रकाश टाकण्यात आला.

## 20 जानेवारी 2016 :

सांस्कतिक विभाग व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात "विवाह – पुर्व- मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला चेतना विकास संस्था वर्धा प्रमुख अतिथी म्हणुन सौ.संघ्याताई सातपुते, संगिता वानखेडे, मनिषा यादलवार, हया उपस्थित होत्या. तक्रार निवारण समिती सचिव प्रा. डॉ. कांचन किटे, हयांनी प्रासताविक केले. प्रमुख अतिथी सौ. संध्याताई सातपुते हिने हया विषयावर विद्यार्थीनींना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. सौ. शेंडे मॅडम हयांचे महत्वपुर्ण मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला महावद्यिालयातील सर्व शिक्षिका व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.



## 26 जानेवारी 2016 :

महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाने **प्रजासत्ताक** दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. **प्रमुख अतिथी** डॉ. वाय. के. खोटेले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुरेश उपाध्याय उपस्थित होते . सकाळी 8.00 वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पाडला व त्यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर तसेच विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.



शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी जि. वर्धा

# सांस्कृतिक समिती अहवाल

## सत्र . 2014 ते 2015

# एस.एस.एन.जे.महाविद्यालय,देवळी,जि. वर्धा

## सांस्कृतिक समिती अहवाल
## 2014-15

### ▪ 26 जुलै 2014 :

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था संस्थापक अध्यक्ष स्व. दाआजी उर्फ बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम सांस्कृतिक समितीने आयोजित केला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बाळकृष्णजी हांडे होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य प्रचारक, वर्धा उपस्थित होते. सकाळी 8.00 वाजता सामुदायिक प्रार्थनेने सुरुवात झाली. सर्वधर्मीय प्रार्थना घेण्यात आली. अध्यक्ष म्हणून लाभलेले महाविद्यालय याचे प्राचार्य डॉ. उपाध्याय सर यांनी स्व. दाआजीचे कार्य आणि कर्तृत्वावर स्मृतीदिनी उजाळा दिला. श्री हांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षण व शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.



### ▪ 15 ऑगस्ट 2014 :



स्वातंत्र्यदिन सोहळ्याचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी देवळी येथील प्रतिष्ठीत नागरीक श्री रमेशपंत आचार्य उपस्थित होते. रा.तु.म. नागपूर विद्यापीठ उन्हाळी परीक्षा 2014 मध्ये वर्ग निहाय व विषयनिहाय प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व लगेचच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस प्रदान केले व त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

- ## 5 सप्टेंबर 2014 :

सांस्कृतिक समितीद्वारे महाविद्यालयात **"शिक्षक दिन"** समारोह आयोजित करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती निमित्त 'शिक्षक व आजचा विद्यार्थी' यांच्यातील सहसंबंध या विषयावर विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थी




सहभागी झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा. अनिल हागोणे व अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य एस.आर. उपाध्याय उपस्थित होते. शिक्षक दिनी प्रमुख अतिथीने 'आजचा विद्यार्थी' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून गुरु-शिष्य नाते परंपरेवर प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. तसेच कर्मचारी वृंद उपस्थित होते.

- ## 2 आक्टों 2014 :



महात्मा गांधी जयंतीनिमित्त महाविद्यालयात सांस्कृतिक समितीने परिसर स्वच्छतेच्या कार्यक्रमाची आखणी करुन परिसर व वर्गखोल्यांची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियानात महाविद्यालयातील विद्यार्थी व तसेच सर्व कर्मचारी सहभागी झाले. त्यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी स्वच्छतेचा मूलमंत्र विद्यार्थ्यांना सांगितला या कार्यक्रमाला सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## ▪ 6 डिसेंबर 2014 :

दलिताचे कैवारी, महामानव, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सांस्कृतिक समितीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी यशवंत महाविद्यालय, वर्धा. मराठीचे प्राध्यापक प्रा. प्रमोद नारायणे तर अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्यानी डॉ. बाबासाहेबांचे अर्थशास्त्रीय विचार विद्यार्थ्यांपुढे कथन केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. उपाध्याय सरांनी बाबासाहेब हे केवळ एकच जाती विषयी भलं पाहणारे नव्हते तर समस्त मानवजात त्यांच्या डोळयासमोर होती. असे विचार प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## ▪ 7 जानेवारी 2014 :




सांस्कृतिक समितीच्या वतीने महाविद्यालयात पोलीस विभाग, देवळी यांनी महिला सुरक्षा व सायबर सिक्युरीटी या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले. 'महाराष्ट्र पोलीस दल रायझींग डे' च्या निमित्ताने बालकल्याण समिती, वर्धा जिल्हा अध्यक्षा- सौ. संगीता धनाढ्य, ठाणेदार जी.के. वासेकर व तसेच होमगार्ड समादेशक डॉ. मोहन गुजरकर उपस्थित होते. अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी भूषविले. अनेक वक्त्यांची भाषण झाली. या कार्यक्रमाला सर्व शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## ▪ 19 व 20 जानेवारी 2015 :

गणराज्य दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील सांस्कृतिक समितीने विविध स्पर्धाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक गुणांना वाव मिळावा, चालना मिळावी या दृष्टीने वाद-विवाद, वक्तृत्व, समयस्फूर्त, रांगोळी, पाककला, गीत गुंजन, एक मिनिट शो. बचाव स्पर्धा

इत्यादी स्पर्धाचे आयोजन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला स्पर्धक म्हणून सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या खास आग्रहास्तव नृत्यस्पर्धा व एकांकिकेचे आयोजन केले. सांस्कृतिक रंगारंग कार्यक्रमातंर्गत विद्यार्थ्यांचे मनोरंजन झाले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

- **26 जानेवारी 2015 :**

सांस्कृतिक समितीने गणराज्य दिनानिमित्त झेंडावंदनाचा कार्यक्रम आयोजित केला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात दि. 19 जाने. 20 जाने. 2015 ला आयोजित केलेल्या विविध स्पर्धेच्या बक्षिस वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी प्रा. डॉ.वानखेडे जे.बी. सायन्स कॉलेज, वर्धा. उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. स्वागत समारोह कार्यक्रमानंतर प्रमुख अतिथीने ‘भारतीय राज्यघटना’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर विविध स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकाचे कौतुक करुन त्यांना मुख्य अतिथी व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. तसेच महाविद्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.



